# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.१५५/२०२२

सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, '०६ जून' हा दिवस 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्यात येत असून शिवस्वराज्य दिनाच्या पूर्वसंध्येला विद्यापीठातील 'खाशाबा जाधव क्रीडा संकुल' येथील विविध इमारतींचा उद्घाटन समारंभ रविवार, दिनांक ०५ जून, २०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजता **(रविवार सुट्टीच्या दिवशी)** आयोजित करण्यात आलेला आहे. सदर समारंभानिमित्त विद्यापीठ कार्यालय सकाळी ११.२० ते सायंकाळी ७.०० पर्यंत सुरु राहील याची सर्वांनी नोंद घेवून कार्यालयात उपस्थित रहावे. सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांनी आपले विभागातील बायोमॅट्रिक उपस्थिती प्रणालीव्दारे आपली उपस्थिती नोंदवून विभागातील हजेरीपत्रकामध्ये स्वाक्षरी करुन कार्यक्रमात सहभागी व्हावयाचे आहे.

सदर समारंभाचे सविस्तर परिपत्रक सर्वसाधारण विभागाकडून स्वतंत्रपणे काढण्यात येत आहे. उपरोक्त दिवसाची पर्यायी सुट्टी यथावकाश जाहिर करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/२४६५
दिनांक : ०२ जून, २०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.